# पीएच.डी सारांश

## कविवर्य वसंत बापट यांच्या गीते व काव्यामधून प्रतिबिंबित होणारे मूल्यिशक्षण व माध्यमिक शिक्षण स्तरावर त्यांच्या उपयुक्ततेचा अभ्यास

**डॉ. एच वाय देवरे**

### (१) संशोधनाची उद्दिष्टे -

(१) कविवर्य वसंत बापटांच्या सर्व प्रकाशित कवितांची प्राप्ती करणे. अनुवादित व पुनरुक्त झालेल्या कविता वगळूण मूळ स्वरूपातील एकूण प्रकाशित कवितांची संख्या ठरविणे.

(२) कविवर्य बापटांच्या प्रकाशित मूळ कवितांमधून अभिव्यक्त झालेली मूल्ये शोधून काढूण त्या मूल्यांसाठी पूर्ण कविता किंवा समर्पक काव्यांश यांची मांडणी करणे.

(३) कविवर्य बापटांच्या काव्यात आढळूण येणाऱ्या मूल्यांची गटात वर्गवारी करणे. प्रत्येक गटात येणारी मूल्ये ठरविणे आणि प्रत्येक मूल्यांसाठी प्राप्त होणाऱ्या कविता/काव्यांशाची संख्या शोधणे.

(४) कविवर्य बापटाच्या काव्यांमध्ये मूल्यांचा कोणता गट प्रभावी ठरतो आणि प्रत्येक गटातील कोणते मूल्य सर्वाधिक प्राधान्याने आलेले आहे याचा शोध घेणे.

(५) कविवर्य वसंत बापटांच्या काव्यांतून व्यक्त झालेल्या मूल्यांची माध्यमिक शिक्षण स्तरावरील मूल्यशिक्षण अध्यापासाठी उपयुक्तता तपासणे.

### (२) संशोधनासाठीची गृहीतके

१) बापटांच्या कवितांचा व गीतांचा मूल्यविचारांचा आशय विश्लेषणाद्वारे शोध घेता येतो व त्यांची सुसंगत मांडणी करता येते.

२) बापटांच्या विविध प्रकाशित कवितांमध्ये व गीतांमध्ये मूल्यविचार निश्चितपणे अंतर्भूत असून ते शोधून काढता येतात व त्यांची मांडणी करता येते.

३) बापटांच्या काव्यातून प्रतिबिंबित झालेले मूल्यविचार सर्वकालिक उपयुक्ततेचे आहेत.

४) बापटांच्या काव्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात उपयोग होतो.

५) बापटाच्या काव्यांमधून व्यक्त झालेल्या मूल्यांचा माध्यमिक शिक्षण स्तरावरील मूल्यशिक्षण अध्यापासाठी उपयुक्तता स्पष्ट करता येते व त्याद्वारे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होऊ शकतात.

६) बापटांच्या काव्यांतील मूल्यविचारांमुळे व्यक्ती व समाज परिवर्ताला निश्चितपणे साह्य मिळू शकते.

### (३) नमुना

१) प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने कविवर्य बापटांच्या १९ काव्यसंग्रहातील व गीतांतील एकूण ८७८ कविता निवडलेल्या होत्या. पण त्यांची छाननी केली असता संपादित काव्यसंग्रहात पुनरुक्त झालेल्या काही कविता आढळल्या. अशा पुनरुक्त झालेल्या कविता वगळून त्यांच्या स्वर्िमित ७५६ कविताच संशोधन अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या आहेत. तोच संशोधाचा न्यादर्श आहे.

२) मूल्य शिक्षणाच्या अभ्यासासाठी ५० शिक्षकांचे सप्रयोजन पद्धतीने निवड करण्यात आली होती व त्यांचा मराठी शिकविण्याचा अनुभव १० वर्षांपेक्षा अधिक होता.

३) मुलाखतीसाठी बापटांच्या सानिध्यात अधिक जवळ असलेल्या ५ तज्ज्ञ व्यक्तींची सप्रयोजन पद्धतीने निवड केली.

### (४) संशोधन पद्धती

प्रस्तुत अभ्यास विषयासाठी संशोधनाच्या पद्धतीतील आशय विश्लेषण तंत्र / पद्धतीचा वापर करण्यात आला व त्याच बरोबर वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आली.

कविवर्य बापटांच्या काव्यात आढळलेल्या कवितांतील मूल्ये पुढील सुत्रानुसार काढले-

मूल्यांची टक्केवारी = कविता / काव्यांश ÷ एकूण कविता x १००

कविवर्य बापटांच्या काव्यात आढळलेल्या एकूण मूल्यांना मिळालेले भारांश पुढील सुत्रानुसार काढले-

भारांश = मूल्यांची टक्केवारी ÷ आढळलेली मूल्ये

कविवर्य बापटांच्या काव्यात आढळलेल्या एकूण मूल्यांना मिळालेले प्रतिमूल्य टक्केवारी पुढील सुत्राुसार काढले-

प्रतिमूल्य टक्केवारी = प्रतिमूल्य काव्यांश /कविता ÷ एकूण कविता x १००

**(५) संशोधनाचे निष्कर्ष**

१) बापटांच्या काव्यामध्ये संशोधकाला उपलब्ध झालेली एकूण मूल्ये ७२ आणि त्यांची गटनिहाय संख्या पुढीलप्रमाणे- राजकीय मूल्ये ०७, ज्ञान विज्ञाननिष्ठा मूल्ये ०६, सामाजिक मूल्ये २०, वैयक्तिक मूल्ये २३, सांस्कृतिक मूल्ये ०७ आणि आध्यात्मिक/धार्मिक मूल्ये ०९, यावरून असे लक्षात येते की, ७२ पैकी ४३ मूल्ये म्हणजे ५९.७२ अर्थात ६०% मूल्ये ही वैयक्तिक आणि सामाजिक गटातीलच आहेत. ही टक्केवारी निम्म्यापेक्षा जास्त असल्याने बापटांचा सर्वाधिक भर हा वैयक्तिक आणि सामाजिक या मूल्यांवरच आहे.

२) लोकशाही समाजवादाबरोबर बापटांवर भारतीय संस्कृतीचा फार मोठा प्रभाव असल्यामुळे त्यांच्या कविता/काव्यांशामध्ये ९ मूल्ये म्हणजे १२.५०% महत्त्व आध्यात्मिक/धार्मिक मूल्यांना दिलेले आढळून येते.

३) बापटांच्या एकूण अभ्यासलेल्या ७५६ कवितांपैकी ३३४ कविता म्हणजे ४४.१८% कविता/ काव्यांशामध्ये सामाजिक मूल्ये आढळून आली, तर ७५६ कवितांपैकी १२४ कविता म्हणजे १६.४०% कविता/काव्यांशामध्ये वैयक्तिक मूल्य आढळून आली. म्हणजेच सामाजिक मूल्यांच्या बाबतीत सरासरी २.२०% इतकी कविता/काव्यांश संख्या मूल्यप्रधान आहे, तर वैयक्तिक मूल्यांच्या बाबतीत सरासरी ०.७१% इतक्या कविता/काव्यांश संख्या मूल्यप्रधान आहेत.

४) ज्ञान-विज्ञान मूल्यांची संख्या ६ म्हणजे ८.३३% इतके महत्त्व ज्ञानविज्ञाननिष्ठ मूल्यांना मिळाले आहे.

५) बापटांच्या काव्यांमध्ये राजकीय व सांस्कृतिक मूल्ये ही आलेली आहेत. त्याची प्रत्येकी संख्या ७ म्हणजे १९.४४% इतके महत्त्व मिळाले आहे.

६) बापटांच्या २४ कविता/काव्यांशामध्ये ०९ आध्यात्मिक/धार्मिक मूल्यांविषयीच्या कविता आढळून आल्या. प्रत्येक आध्यात्मिक मूल्यांसाठी कविता/काव्यांशाची संख्या सरासरी ०.३५% इतकी आढळून आली. म्हणजे बापटांच्या एकूण कविता/काव्यांशापैकी ३.१७% कविता/काव्यांशामध्ये आध्यात्मिक मूल्ये आढळतात.

७) बापटांच्या साहित्यात भारतीय आणि वैश्विक संस्कृतीचा समावेश असलेल्या ७ मूल्यांसाठी ७५६ पैकी ४४ म्हणजे ५.८२ कविता/काव्यांश आढळून आले. त्यामुळे प्रतिमूल्ये कविता/काव्यांश संख्या ०.८३% इतकी आढळून आली.

८) बापटांच्या ७५६ कवितांपैकी २२ कविता/काव्यांशामध्ये ज्ञानविषयक ६ मूल्ये आढळून आली, म्हणजे एकूण कवितांपैकी २.९१% कविता/काव्यांशामध्ये

ज्ञानविषयक ६ मूल्ये आढळून आली. प्रत्येक मूल्यांसाठी सरासरी ०.४९% इतकी कविता/काव्यांश संख्या असल्याचे दिसून आले.

९) एकूण ७ मूल्यांसाठी ७५६ पैकी २६८ म्हणजे ३५.४५% राजकीय मूल्यांसाठीच्या कविता/काव्यांश आढळून आले. त्यामुळे प्रती राजकीय मूल्य सरासरी ५.०६% इतकीच कविता/काव्यांश संख्या भरते.

१०) बापटांच्या साहित्यात अगदी कमी प्रमाणात आढळलेली मूल्ये ही कृतार्थता, म्रता, ज्ञा, सृजा, क्षमाशीलता, सोशिकता, -नवनिर्माण अशा प्रकारची आहेत.